International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# ग्रामीण भागातील मागासवर्गीय व बिगर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या समायोजन वंचितता या समस्यांचा अभ्यास

**कल्पना बळवंत पाटील**
*सहायक प्राध्यापक, मानसशास्त्र*
*मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय बोरगाव. ता.वाळवा, जि. सांगली*
*Corresponding Author - कल्पना बळवंत पाटील*
**DOI - 10.5281/zenodo.10939409**

**प्रस्तावना:**

आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी माणूस भोवतालच्या परिस्थितीशी कोणत्या प्रकारे अंतरक्रिया करतो आणि आपली जबाबदारी तो कशाप्रकारे पार पडतो, यावर त्याचे समायोजन अवलंबून असते. पण सभोवतालची परिस्थिती सतत बदलत असते त्यामुळे माणसांच्या मनोव्यापारातही बदल होत असतात. एकंदरीत आंतरिक व बाह्य परिस्थितीत (वर्तनात) बदल घडून आले, म्हणजे त्यानुसार माणसांच्या स्वतःच्या वर्तनातही बदल करावे लागतात.

“परिस्थितीच्या आवश्यकतेनुसार माणसाच्या वर्तनात बदल घडून येणे म्हणजे समायोजन होय.”

“वैयक्तिक आवडीनिवडी गरजा तसेच सामाजिक घटक यांना अनुसरून योग्य त्या समाजमान्य प्रतिक्रिया देणे म्हणजे समायोजन होय.”

समायोजन ही व्यक्तीच्याजन्मापासून मृत्यूपर्यंत अखंड चालणारी प्रक्रिया आहे. एकदा बालवयात समायोजन केल्याने जीवनातील सर्व समस्या सुटत नाहीत. प्रत्येक विकासाच्या अवस्थेत वेगवेगळ्या समस्या निर्माण होतात. साहजिकच विकासाच्या प्रत्येक अवस्थेत व्यक्तीला समायोजन करावे लागते. थोडक्यात प्रत्येक विकासावस्थेत त्या त्या वयाला अनुरूप वर्तन केले तरच सुसमायोजन घडते.

समायोजन दोन प्रकारे केले जाते-

अ) परिस्थितीत बदल करणे-. परिस्थितीत बदल करणे म्हणजे जिथे शक्य आहे तिथे परिस्थितीत बदल करून परिस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करणे.

ब) स्वतःमध्ये बदल करणे. – जेव्हा परिस्थितीमध्ये बदल करणे शक्य नसते तेव्हा व्यक्तीस्वतःमध्ये बदल करते आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करते. यासाठी तडजोड करणे ,माघार घेणे यासारखे मार्ग वापरले जातात

**कुटुंब:**

कुटुंब हा समाजाचा अगदी प्राथमिक घटक आणि व्यक्तीच्या व्यक्तिमत्व निर्मितीमधील महत्त्वाचा घटक असूनही आतापर्यंत कुटुंबाचा फारसा विचार केला गेला नाही. परंतु मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून व्यक्तीच्या व्यक्तिमत्व घडणीत कुटुंबाचा वाटा मोठा आहे. सामाजिक, नैतिक, शैक्षणिक, भावनिक वातावरण या सर्वांचा परिणाम व्यक्तीच्या व्यक्तिमत्व निर्मितीवर होतो. इंग्रजीमधील Family हा शब्द Famalus या लॅटिन संज्ञेपासून निर्माण झाला आहे. त्यामध्ये केवळ आई-वडील व मुले यांचा समावेश न होता घरातील अन्य व्यक्ती, इतर नातेवाईक, नोकर चाकर यांचाही समावेश होतो, असे एल्मर यांनी म्हटले आहे.

**आरोग्य:**

आरोग्यात भावनिक व प्रेरणात्मक घटकांचा कार्यभाग असतो. हे अनेक वर्षापासून मान्य झालेले आहे. शरीर निरोगी राहण्यासाठी मन निरोगी असावे लागते, ही गोष्ट तत्ववेत्यांनी व विचारवंतांनी अनेक वर्षांपासून लक्षात घेतली आहे. केवळ रोगाचा अभाव म्हणजे आरोग्य नव्हे, तर आरोग्य म्हणजे शारीरिक मानसिक व सामाजिक दृष्ट्या संपूर्णपणे सुस्थितीची अवस्था होय. निरोगी शरीर असेल तर कोणत्याही व्यक्तीला शारीरिक अडचणींना सामोरे जावे लागत नाही, त्यामुळे त्या व्यक्तीला सुख समाधान मिळत असते. जर व्यक्ती ताणतणावांमध्ये जगत असेल तर तिला कोणत्याही परिस्थितीत झोप लागत नाही. सकाळी उठतेवेळेस थकवा जाणवतो, त्यामुळे शरीराच्या अनेक समस्या जाणवतात. उदाहरणार्थ मळमळणे, डोकेदुखी, चक्कर येणे, त्वचेच्या समस्या, अनेक संसर्गजन्य आजार, इत्यादी.

**सामाजिक समायोजन:**

व्यक्ती समाजात वावरत असताना सामाजिक घटकांशी कशाप्रकारे समायोजन करते म्हणजेच तिचे मित्र मैत्रिणींशी असलेले संबंध, तिचा स्वभाव, समूहात असतानाचे तिचे वर्तन, तिची इतरांशी बोलण्याची पद्धत, सहजतेने इतरांमध्ये मिसळण्याची कौशल्य, या सर्व घटकांमध्ये व्यक्ती कसे वर्तन करते यावर तिचे समायोजन अवलंबून असते.

**भावनिक समायोजन:**

व्यक्ती आपल्या भावनांवर कसे नियंत्रण ठेवते, तिच्यात न्यूनगंड निर्माण होतो का? भविष्यात सामना करावा लागणाऱ्या समस्यांची तो चिंता करतो का? मनाविरुद्ध एखादी गोष्ट घडली असता तो दुःखी होतो का? गोंधळल्यामुळे कामात चुका होतात का? जे आपण ध्येय समोर ठेवले आहे ते पूर्ण होणार नाही अशी त्याला भीती वाटते का? या सर्व घटकांचा व्यक्तीच्या वर्तनावर परिणाम होऊन व्यक्तीच्या समायोजनावर परिणाम होतो.

**शैक्षणिक समायोजन:**

या समायोजनाचा विचार करताना व्यक्ती जे शिक्षण घेत आहे त्यात ती समाधानी आहे का?

तसेच तिचे शिक्षकांशी, समवयस्क विद्यार्थ्यांशी व शैक्षणिक संस्थेतील इतर व्यक्तींशी असणारे संबंध यावर तिचे शैक्षणिक समाज समायोजन अवलंबून असते.

**वंचितता:**

सामाजिक शास्त्रामध्ये सामाजिक दृष्ट्या, आर्थिक दृष्ट्या वंचित शैक्षणिक दृष्ट्या वंचित अथवा सांस्कृतिक दृष्ट्या वंचित अशा अनेक संज्ञा वापरल्या आहेत. **A situation in which you do not have things or conditions that are usually considered necessary for a pleasant life** (Cambridge English Marathi Dictionary) त्यांचा अर्थ असा की वंचित म्हणजे मानवाच्या कमाल विकासासाठी ज्या सुविधा लागतात त्यापासून वंचित.

ही संकल्पना प्रायोगिक मानसशास्त्रज्ञांनीही वेगळ्या संदर्भात वापरली आहे. प्रयोगात वापरल्या जाणाऱ्या प्राण्यांना नेहमीच्या पर्यावरणातील उद्दीपनांपासून वंचित ठेवण्यात आले आणि या स्थितीचा प्राण्यांच्या ज्ञानात्मक आणि संवेदनात्मक उद्दीपनांवर काय परिणाम होतो याचा अभ्यास करण्यात आला. नंतरच्या काळात सामाजिक आणि वैकासिक मानसशास्त्रात वंचितता म्हणजे व्यक्तीच्या पर्यावरणातील कमतरता अशी संकल्पना मांडण्यात आली.(डॉ. सिन्हा 1982, डॉ.एल. बी. त्रिपाठी 1982)ही संज्ञा आता संस्कृती अनुभवांच्या बाबतही वापरण्यात येते. संस्कृती वंचितता एखाद्या समाजात एकापेक्षा अनेक संस्कृती अस्तित्वात असल्याचे मानते. उदा. पश्चिमात्य देशात काळे लोक सांस्कृतिक दृष्ट्या वंचित मनण्यात येतात, कारण गोऱ्या लोकांच्या संस्कृतीतील काही अनुभवांपासून ते वंचित असतात.

एक संस्कृती दुसऱ्या संस्कृतीपेक्षा वरचढ असते, या कल्पनेवर जोराचा हल्ला चढविला गेला कारण शास्त्रीय आणि तांत्रिकदृष्ट्या तसे सिद्ध करणे अवघड असते. ज्यांच्या हाती सत्ता नसते अशा समाजातील तळाच्या वर्गांनाही वंचित म्हणण्यात येते.

वंचितांना गरीब हा शब्द ही वापरला जातो. उदा. आदिवासी आणि हरिजन गरीब असतात म्हणून त्यांना वंचित मानण्यात येते.

**संशोधन अभ्यासाचा हेतू:**

ग्रामीण भागातील मागासवर्गीय व विदर्भागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या समायोजन व वंचितता या समस्यांचा अभ्यास करणे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

1. ग्रामीण भागातील मागासवर्गीयविद्यार्थ्यांच्या समायोजनाचे मापन करणे.
2. ग्रामीण भागातील बिगर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या समायोजनाचे मापन करणे.
3. ग्रामीण भागातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वंचिततेचे मापन करणे.
4. ग्रामीण भागातील बिगर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वंचिततेचे मापन करणे.

5. ग्रामीण भागातील मागासवर्गीय व बिगर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या समायोजनातील फरक तपासणे.
6. ग्रामीण भागातील मागासवर्गीय व बिगर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वंचिततेतील भेद अभ्यासणे.

**सिद्धांतकल्पना:**

1. ग्रामीण भागातील मागासवर्गीयवबिगर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या समायोजनामध्ये फरक असतो.
2. ग्रामीण भागातील मागासवर्गीय व बिगर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वंचिततेमध्ये फरक असतो.
3. ग्रामीण भागातील बिगर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या समायोजनाचा दर्जा कमी असतो.
4. ग्रामीण भागातील बिगरमागासवर्गीय विद्यार्थ्यांच्यापेक्षा मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये वंचिततेचे प्रमाण जास्त असते.

**पद्धतीशास्त्र:**

**नमुना :**

प्रस्तुत संशोधनासाठी मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय बोरगाव या महाविद्यालयातील प्रत्येकी 30 प्रमाणे एकूण साठ मुलांचा स्वैर पद्धतीने नमुना घेतला गेला.

**साधने:**

प्रस्तुत अभ्यासासाठी खालील प्रमाणे मानसशास्त्रीय चाचण्या वापरल्या.

1. डॉ. सिन्हाव डॉ. सिंग यांची समायोजनाची चाचणी वापरण्यात आली याचाचणी मध्ये १९२ प्रश्न असून होय किंवा नाही असे दोन पर्याय आहेत. प्रश्नवाचून योग्य पर्यायापुढे कंसात (√) अशी खूण करावयाची आहे. या चाचणीची द्विभागीय विश्वसनीयता ०.९४ व यथार्थता वेगवेगळ्या क्षेत्रांची ०.१४ ते ०.३२ आहे.
2. डॉ. मिश्रा व डॉ. त्रिपाठी यांची वंचितता ही चाचणी वापरण्यात आली. या चाचणीत एकूण १६ विधाने आहेत, त्याला प्रत्येकी ५ पर्याय असून त्यातील योग्य त्या पर्यायापुढील चौकटीत (√) अशी खूण करावयाची आहे, या चाचणीची द्विभागीय विश्वसनीयता ०आहे ९५..

**संख्याशास्त्राचा वापर:**

प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचलन आणि टी मूल्य चा अवलंब करण्यात आलेला आहे.

**कार्यपद्धती किंवा विधी:**

या संशोधनासाठी मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. सर्वप्रथम महाविद्यालयाच्या प्राचार्यांना भेटून त्यांची परवानगी घेण्यात आली. त्यानंतर तेथील विद्यार्थ्यांचे छोटे छोटे गट करून, समायोजन शोधिका व वंचितता चाचणी

सोडविण्यास दिली. चाचणी सोडवण्यासाठी योग्यत्या सूचना दिल्या. विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधून चांगले संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. विद्यार्थ्यांना सूचना समजल्याची खात्री झाल्यानंतर कमीत कमी वेळात चाचणी सोडवून घेतली व सर्व उत्तर पत्रिका जमा करण्यात आल्या.

**फलिते**

**तक्ता क्रमांक १ – मुले ग्रामीण भागातील मागासवर्गीय व बिगर मागासवर्गीय मुलांच्या समायोजन आणि वंचिततेची मध्यमाने, प्रमाण विचलन व 't' मूल्य**

| **अ.क्र.** | **समूह** | **समायोजन** | | **वंचीतता** | |
|---|---|---|---|---|---|
| १( | बिगर मागासवर्गीय मुले (१५) | मध्यमान | प्रमाण विचलन | मध्यमान | प्रमाण विचलन |
| | | ३५ १३. | १४ ७५. | २१५ ४६. | ३० ७२. |
| २( | मागासवर्गीय मुले (१५) | ४० ०६ . | १३ ६३. | २१७ ५३. | २३ २४. |
| | मुक्तीप्रमाण संख्या )df( | २८ | | २८ | |
| | मूल्य 't' | ७३३. | | १४०६. | |
| | सार्थकता | ०पातळीवर सार्थ आहे ०१.. | | ०पातळीवर सार्थ आहे ०१.. | |

**तक्ता क्रमांक २ – मुली ग्रामीण भागातील मागासवर्गीय व बिगर मागासवर्गीय मुलींच्या समायोजन आणि वंचिततेची मध्यमाने, प्रमाण विचलन व 't' मूल्य.**

| अ.क्र. | समूह | समायोजन | | वंचीतता | |
|---|---|---|---|---|---|
| १( | बिगर मागासवर्गीय मुली (१५) | मध्यमान | प्रमाण विचलन | मध्यमान | प्रमाण विचलन |
| | | ३५ ४६. | १४ ६८. | २०९ ८६. | ३४ ६९. |
| २( | मागासवर्गीय मुली (१५) | ३२ ८०. | ०९ ५६. | २११ ६०. | ४३ ८०. |
| | मुक्तीप्रमाण संख्या )df( | २८ | | २८ | |
| | मूल्य 't' | ८ ३४. | | २० ३९. | |
| | सार्थकता | ०पातळीवर सार्थ आहे ०१.. | | ०पातळीवर सार्थ आहे ०१.. | |

**चर्चा:**

तक्ता क्र.१ - ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुलांचे समायोजनाचे मध्यमान ३५.१३ व प्रमाण विचलन १४.७५ आहे, तर मागासवर्गीय मुलांच्या समायोजनाचे मध्यमान ४०.०६ व प्रमाण विचलन १३.६३ आहे. मुक्तीप्रमाण संख्या (df) २८ असताना या दोन समूहातील समायोजनामध्ये असणारा फरक

लक्षणीय आहे की नाही हे पाहण्यासाठी ‘t’ मूल्य काढले. ते ‘t मूल्य ७.३३ आले. मुक्ती प्रमाण संख्या २८ वर ‘t’ मूल्य लक्षणीयतेच्या ०.०१ पातळीवर सार्थ आहे, म्हणजे दोन समूहांच्या समायोजनामध्ये फरक आहे, या ठिकाणी मागासवर्गीय मुलांचे समायोजन चांगले आहे. यावरून असे दिसते की, ग्रामीण भागातील मागासवर्गीयवबिगर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या समायोजनामध्ये फरक असतो, ही सिद्धांतकल्पना सिध्द झाली आहे.

१. तक्ता क्र.१- ग्रामीण भागातील बिगर मागासवर्गीय मुलांचे वंचिततेचे मध्यमान २१५.४६ आहे व प्रमाण विचलन ३०.७२ आहे. तर मागासवर्गीय मुलांच्या वंचिततेचे सरासरी मध्यमान २१७.५३ व प्रमाण विचलन २३.२४ आहे. मुक्तीप्रमाण संख्या २८ असताना या दोन समूहातील फरक लक्षणीय आहे की नाही हे पाहण्यासाठी ‘t’ मूल्य काढले ते ‘t’ मूल्य ४.०६ आले. मुक्तीप्रमाण संख्या २८ वर हे ‘t’ मूल्य लक्षणीयतेच्या ०.०१ पातळीवर सार्थ आहे. म्हणजेच दोन समूहात फरक आहे. या ठिकाणी मागासवर्गीय मुलांचे वंचिततेचे प्रमाण जास्त आहे. यावरून असे दिसते की, ग्रामीण भागातील बिगरमागासवर्गीय विद्यार्थ्यांच्यापेक्षा मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये वंचिततेचे प्रमाण जास्त असते. ही सिद्धांतकल्पना सिध्द झाली आहे.

तक्ता क्र. २ - ग्रामीण भागातील बिगर मागासवर्गीय मुलींचे समायोजनाचे मध्यमान ३५.४६ व प्रमाण विचलन १६.६८ आहे तर मागासवर्गीय मुलींच्या समायोजनाच्या मध्यमान ३२.८० व प्रमाण विचलन ९.५६ आहे. मुक्तीप्रमाण संख्या २८ असताना या दोन समूहातील समायोजनामध्ये असणारा फरक लक्षणीय आहे की नाही हे पाहण्यासाठी ‘t’ मूल्य काढले ते ‘t’ मूल्य ८.३४ मुक्तीप्रमाण संख्या २८ असताना हे ‘t’ मूल्य लक्षणीयतेच्या ०.०१ पातळीवर सार्थ आहे. म्हणजे दोन समूहांच्या समायोजनामध्ये फरक आहे.

तक्ता क्र. २ - ग्रामीण भागात भागातील बिगर मागासवर्गीय मुलींचे वंचिततेचे मध्यमान २०९.८६ व प्रमाण विचलन ३४.६९ आहे. तर मागासवर्गीय मुलींच्या वंचिततेचे सरासरी मध्यमान २११.६६ व प्रमाण विचलन ४३.८० आहे. मुक्तीप्रमाण संख्या २८ असताना या दोन समूहातील वंचितता या घटकाबाबत लक्षणीय फरक आहे की नाही हे पाहण्यासाठी ‘t’ मूल्य काढले ते ‘t’ मूल्य २०.३९ आले. मुक्तीप्रमाण संख्या २८ असताना हे ‘t’ मूल्य लक्षणीयतेच्या ०.०१ पातळीवर सार्थ आहे.

**निष्कर्ष:**

1. ग्रामीण भागातील बिगर मागासवर्गीय व मागासवर्गीय मुलांच्या समायोजनामध्ये लक्षणीय फरक आहे
2. ग्रामीण भागातील बिगर मागासवर्गीय व मागासवर्गीय मुलांच्या वंचितते मध्ये लक्षणीय फरक आहे.
3. ग्रामीण भागातील बिगर मागासवर्गीय व मागासवर्गीय मुलींच्या समायोजनामध्ये फरक आहे.

4. ग्रामीण भागातील बिगर मागासवर्गीय व मागासवर्गीय मुलींच्या वंचितते मध्ये लक्षणीय फरक आहे.

**मर्यादा:**

प्रस्तुत अभ्यासाच्या पुढील काही मर्यादा आहेत.

1. प्रस्तुत अभ्यासासाठी एकाच कॉलेजमधील विद्यार्थ्यांची व विद्यार्थिनींची नमुना म्हणून स्वैर पद्धतीने निवड केल्यामुळे निष्कर्षास मर्यादा आल्या आहेत.
2. माहितीचे विश्लेषण करण्यासाठी संख्याशास्त्रीय साधनांचा मर्यादित वापर केला आहे.
3. नमुन्यातील प्रयुक्तांची संख्या मर्यादित असल्याने नमुन्याआधारे काढलेले निष्कर्ष प्रातिनिधिक असतीलच असे नाही.

**संदर्भ:**


1. Baron R, Byrne D, Branscombe N (2014), Social Psychology, Indian adaptation, Pearson, New Delhi.
2. Feldman R, (2015), Understanding Psychology, 12th Edition, McGrawHill Education (India), Private Limited.
3. गाडेकर ,पाटील ,इनामदार ,(२०१३(, प्रगत सामाजिक मानसशास्त्र डायमंड , पब्लिकेशनपुणे ,.
4. र ,पंडित .वि .(२००९(, शैक्षणिक मानसशास्त्र ,पिंपळापुरे पब्लिकेशन , नागपूर.